# राज्यातील हवामान,खरीप हंगाम २०१९ पिक परिस्थिती व रब्बी हंगाम २०१९-२० पिक पेरणी, पिक परिस्थितीचा दिनांक १४/०२/२०२० अखेरचा साप्ताहिक अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** – राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. नागपूर विभागात बहुतांश ठिकाणी तर लातूर विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. तसेच पुणे विभागात काही ठिकाणी तर कोंकण व अमरावती विभागात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम २०१९ पिक परिस्थिती** –

राज्यात कापूस पिकाची वेचणी अंतिम टप्प्यात आहे. तूर पिक शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून,काढणी व मळणीची कामे प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग** – निरंक.

कृषि विभागामार्फत किड व रोग नियंत्रणासाठी प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे. राज्यात किड व रोगांवरील उपाययोजना म्हणून शेतीशाळा, प्रात्यक्षिके, कृषि विद्यापिठाकडून पीक संरक्षणाचे दृष्टीने सल्ले, योजनांतर्गत फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा, बाधीत क्षेत्रास तज्ञांच्या भेटी, जनजागृतीसाठी विभागस्तरावर हंगामपूर्व कार्यशाळा, गावबैठका, एसएमएसद्वारे सल्ले इ. उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

दि.०७.०२.२०२० अखेरच्या अवेळी पाऊस व गारपिटीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राबाबतच्या नजरअंदाजित प्राथमिक अहवालानुसार डिसेंबर,२०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत राज्यात ९८,०८१ हेक्टर क्षेत्र अवेळी पाऊस व गारपिटीमुळे बाधित झाले आहे. बाधित पिकांमध्ये प्रामुख्याने कापूस, तूर, हरभरा, गहू, ज्वारी, संत्रा, मोसंबी, आंबा व भाजीपाला या पिकांचा समावेश आहे.

**रब्बी हंगाम २०१९-२०**– राज्यात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५६.९३ लाख हेक्टर असून दि.१४ फेब्रुवारी, २०२० अखेर ५८.३९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०३%) पेरणी झाली आहे. ज्वारी पिक फुलोरा, दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु आहे. हरभरा फुलोरा, घाटे भरणे ते घाटे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु आहे. गहू पिक ओंब्या लागणे, ओंबीमध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. करडई पिक बोंडे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. तर मका पिक फुलोरा, कणसे लागणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे.



**किड व रोग-** राज्यात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**उन्हाळी हंगाम २०२०-** कोल्हापूर विभागात उन्हाळी भात पिकाची रोपे लागणीची कामे सुरु असून वैशाखि मूग, मका व भुईमूग पिकाच्या पेरण्या सुरु आहेत. तसेच नागपूर विभागात उन्हाळी भात पिकासाठी रोपवाटिका तयार करण्याचे काम सुरु आहे.

**विभागीय पिक परिस्थिती-**

**कोकण विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. तसेच दिवसाच्या तपमानात वाढ झाली.

**रबी हंगाम २०१९-२०** - विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून दि.१४ फेब्रुवारी, २०२० अखेर ०.३० लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप पिकांची कापणी झालेल्या व ओलावा असलेल्या क्षेत्रात पिकांच्या पेरणीची कामे झाली आहेत. कडधान्ये पिके शेंगा/घाटे लागणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** निरंक

**नाशिक विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९** –विभागात कापूस पिकाची अंतिम वेचणी प्रगतीपथावर आहे. तुर पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग**- निरंक.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.३१ लाख हेक्टर असून दि.१४ फेब्रुवारी, २०२० अखेर ५.६५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३१%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. ज्वारी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंब्या लागणे ते ओंब्या भरणेच्या अवस्थेत आहे. तेलबिया पिके फुलोरा अवस्थेत आहे.

**किड व रोग**- विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**पुणे विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. विभागात काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात तूर पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी अंतिम टप्प्यात आहे. कापूस पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, वेचणी प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग**- निरंक

**रबी हंगाम २०१९**-२०- विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र १७.८१ लाख हेक्टर असून दि.१४ फेब्रुवारी, २०२० अखेर १२.१३ लाख हेक्टर क्षेत्रावर (६८%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक ओंब्या लागणे, दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढ, फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक फुलोरा, दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. हरभरा पिक फुलोरा ते घाटे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. सुरु ऊसाची लागवड चालू आहे.

**किड व रोग**- विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तसेच हवामान कोरडे होते.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात तूर पिकाची काढणी अंतिम टप्प्यात आहे.

**किड व रोग**-निरंक

**रबी हंगाम २०१९-२०**- विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५.०७ लाख हेक्टर असून दि.१४ फेब्रुवारी, २०२० अखेर ४.५२ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक कांडी धरणे, फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे धरणे ते घाटे भरणे तर काही ठिकाणी घाटे पक्वतेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक फुलोरा, दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. मका पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. पुर्व हंगामी ऊस वाढीच्या अवस्थेत तर सुरु ऊसाची लागवड सुरु असून, लागवड झालेले पिक उगवणीच्या अवस्थेत आहे. करडई पिक पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**उन्हाळी हंगाम २०१९-२०**- विभागात भात रोपे लागणीची कामे सुरु असून, वैशाखि मूग, मका व भुईमूग पिकाच्या पेरण्या सुरु आहेत.

**किड व रोग**- विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात कापूस पिकाच्या वेचणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. तूर पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग**- निरंक.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.७२ लाख हेक्टर असून दि.१४ फेब्रुवारी, २०२० अखेर ९.५० लाख हेक्टर क्षेत्रावर (१२३%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक फुलोरा, घाटे लागणे, घाटे भरणे ते घाटे पक्वतेच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंब्या लागणे ते ओंबीमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक कणसे लागणे ते कणसे भरणेच्या तर काही ठिकाणी दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक तुरे लागणे ते कणसे भरणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग**- विभागात काही ठिकाणी ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**लातूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम २०१९** -विभागात तूर पिकाची काढणी अंतिम टप्प्यात आहे. कापूस पिकाची अंतिम वेचणी चालू असून, बऱ्याच ठिकाणी वेचणी पुर्ण झाली आहे.

**किड व रोग**- निरंक.

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ११.१४ लाख हेक्टर असून दि.१४ फेब्रुवारी, २०२० अखेर १४.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३१%) पेरणी झाली आहे. विभागात रब्बी ज्वारी पिक कणसे लागणे, दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंब्या लागणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे लागणे, घाटे भरणे ते घाटे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु आहे. करडई पिक बोंडे धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक तुरे, कणसे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात तूर पिकाची कापणी आणि मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहे.

**किड व रोग-** निरंक

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ६.४७ लाख हेक्टर असून दि.१४ फेब्रुवारी, २०२० अखेर ७.५६ लाख हेक्टर क्षेत्रावर (११७%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक फुलोरा, घाटे भरणे ते घाटे पक्वतेच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंब्या धरणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**नागपूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात तूर पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, कापणी व मळणी प्रगतीपथावर आहे. कापूस पिकाची वेचणी अंतिम टप्प्यात आहे.

**किड व रोग-** निरंक.

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१२ लाख हेक्टर असून दि.१४ फेब्रुवारी, २०२० अखेर ४.१९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक ओंब्या लागणे ते ओंब्या भरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहेत. ज्वारी पिक फुलोरा ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे. इतर कडधान्ये पिके फुलोरा ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहेत.

**उन्हाळी हंगाम २०१९-२०-** विभागात उन्हाळी भात पिकासाठी रोपवाटिका तयार करण्याचे काम सुरु आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

## महाराष्ट्र राज्यातील रब्बी हंगाम २०१९-२० मुख्य पिकाखालील दि. १४.०२.२०२० पर्यंतचा पेरणीचा साप्ताहीक प्रगती अहवाल.

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (१२-१३ ते १६-१७) | मागिल वर्षाची पेरणी दि १५/०२/२०१९ | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रब्बी ज्वारी | २६७८५१३ | १२४६५४७ | १९००४२८ | ७१ | १५२ |
| २ | गहू | १०१४८०४ | ५६६४६६ | ११९९४६५ | ११८ | २१२ |
| ३ | मका | २२५२६० | ११५६३२ | २८३८०२ | १२६ | २४५ |
| ४ | इतर रब्बी. तृणधान्ये | १२४६२ | १२९३४ | ११८१९ | ९५ | ९१ |
| | **एकुण रब्बी. तृणधान्ये** | **३९३१०३९** | **१९४१५७९** | **३३९५५१४** | **८६** | **१७५** |
| ५ | हरभरा | १४९०२४७ | १३१३९९२ | २२८३०२५ | १५३ | १७४ |
| ६ | इतर रब्बी. कडधान्ये | १०९९८६ | १०९००० | १२०५६४ | ११० | १११ |
| | **एकुण रब्बी कडधान्ये** | **१६००२३३** | **१४२२९९१** | **२४०३५८९** | **१५०** | **१६९** |
| | **एकुण रब्बी अन्नधान्ये** | **५५३१२७१** | **३३६४५७०** | **५७९९१०३** | **१०५** | **१७२** |
| ७ | करडई | ८७६०४ | १८००५ | १८९२७ | २२ | १०५ |
| ८ | जवस | २१५०४ | ७६१८ | ८६९२ | ४० | ११४ |
| ९ | तीळ | १४५२ | ५०८ | ३९१ | २७ | ७७ |
| १० | सुर्यफुल | ४१६३२ | ३५२९ | २८०४ | ७ | ७९ |
| ११ | इतर रब्बी तेलबीया | ९६०१ | ४९७५ | ९४५९ | ९९ | १९० |
| | **एकुण रब्बी तेलबीया** | **१६१७९३** | **३४६३४** | **४०२७४** | **२५** | **११६** |
| | **राज्यातील एकुण पीकाखालील पेरणीचे क्षेत्र** | **५६९३०६५** | **३३९९२०४** | **५८३९३७६** | **१०२.५७** | **१७२** |
| | टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित | | | | | |